Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# मराठी साहित्यातील स्वातंत्र्योत्तर कादंबरी वाङ्मयः एक अभ्यास

**प्रा. डॉ. रानमाळ पी.जी.**
मराठी विभाग
मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड,
जि. जालना

**प्रस्तावनाः**

सन १९४५ च्या नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे प्रवाह येऊ लागले. त्याची नांदी दुसऱ्या महायुद्धातून झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर मानवी जीवनाला आलेल्या वैफल्यामुळे स्वत:च्या वास्तवाची आत्यंतिक जाणीव प्रकर्षाने होऊ लागली. मानवी जीवनातील सत्याचीही प्रकर्षाने जाणीव झाली. या प्रवाहात मराठी कादंबरीला ज्यांनी पुढे नेण्याचा प्रयत्न केला त्यात प्रामुख्याने बेडेकर व मर्ढेकर यांचे नाव घेणे आवश्यक आहे. १९६०-६५ या काळात अनेक महत्त्वाच्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. या कादंबऱ्याची नामावली पाहिली तरी त्यांनी विविधांगी जीवन वास्तवाचा छेद घेण्याचा प्रयत्न केला आहे, असे दिसून येईल. वेगवेगळ्या क्षेत्रातले, वेगवेगळ्या स्वरुपाचे जीवनानुभव त्यांनी आत्मसात केले आहेत. परिणामी पुढील काळात मराठी कादंबरी अनेक दिशांनी विकसित होण्याच्या शक्यता निर्माण झाल्या. 'या संदर्भात नवनैतिकवादी कादंबरी, महानगरीय जीवनवास्तवाचे चित्रण करणारी कादंबरी, ग्रामीण - प्रादेशिक कादंबरी, दलित कादंबरी, विज्ञान कादंबरी, चरित्रात्मक कादंबरी, राजकीय, ऐतिहासिक आणि पौराणिक कादंबरी इत्यादी अनेक दिशा स्पष्ट होतात' असे डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी कादंबरीच्या पुढील दिशासंबंधी मत व्यक्त केले आहे. हे मत 'प्रतिष्ठाण'च्या कादंबरी समीक्षा विशेषांकात आपली भूमिका मांडतांना त्यांनी म्हटले आहे.

**स्वातंत्र्योत्तर कादंबरी वाङ्मयः**

१९६० नंतर उद्धव शेळके, भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे, मनोहर शहाणे, पु.शि. रेगे, मनोहर तल्हार, जयवंत दळवी, चिं.त्र्यं. खानोलकर, रणजित देसाई, ए.वि.जोशी, कमल देसाई, शंकर पाटील, अशी कादंबरीकाराची नवी पिढी उदयास आली. साठोत्तर काळात उल्लेखनीय कादंबरीलेखन करणाऱ्या पेंडसे, दांडेकर, साठे, माडगूळकर यांनी १९५० ते ६० या दशकातच कादंबरीलेखनास प्रारंभ केला

 Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

होता. तसेच १९५० ते ६० या दशकात प्राधान्याने कथालेखन करणारे उद्धव शेळके, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील असे काही लेखक साठोत्तर काळात कादंबरी लेखनाकडे वळले आहेत. हे विशेषत: ग्रामीण लेखन करणाऱ्या लेखकाबाबत घडलेले दिसून येते. विभावरी शिरुरकर 'शबरी' (१९६२) सारखी कादंबरी लिहिताना दिसतात. हमीद दलवाई यांच्यासारखा सामाजिक कार्यकर्ता 'इंधन' सारखी साहित्यकृती लक्षणीय ठरावी अशी निर्माण करतात. शरच्चंद्र मुक्तिबोध 'क्षिप्रा'-'सरहद्द'-'जन हे वोळुतू जेथे' या कादंबऱ्या व्यक्ती व समष्टी यांच्या परस्पर संबंधाचा वेध घेत जीवनाच्या स्वतंत्रतेचे महात्म्य सांगतात. वि.स. खांडेकरांची 'ययाति' ही कादंबरी पौराणिक या सदराखाली येणाऱ्या कादंबरी शाखेचा विस्तार घडविण्यास कारणीभूत ठरली आहे, असे लक्षात येते.

प्रादेशिक लेखन करणाऱ्या पेंडसे-दांडेकरांनी साठोत्तर काळात इतर स्वरुपाचेही कादंबरी लेखन केले. 'रथचक्र' नंतर पुन्हा कोकणातच न रमता पेंडसे शहरी मध्यमवर्गीयांच्या जीवनाचे चित्रण करताना दिसतात. (लव्हाळी, आक्टोपस) 'तुंबाडचे खोत' लिहिताना ते पुन्हा ज्यावर त्यांनी हाडामासाच्या माणसाप्रमाणे प्रेम केले होते त्या कोकणाकडे ते वळले. १९९२ मध्ये 'गारंबीची राधा' लिहिताना ते पुन्हा आपल्या मनातल्या नंदनवनाकडे गेले. 'गारंबीचा बापू' ते 'गारंबीची राधा' हा पेंडशांचा प्रवास अनेक चढउतारानी भरलेला आहे. तंत्रशरणरंजकता (गारंबीचा बापू), वादशरणता (फ्राईडवाद-ऑक्टोपस), समर्थ जीवन-दर्शन (रथचक्र) अशा अनेक गोष्टी त्यांत दिसून येतात. अशाच नव्या अनुभविश्वाचा वेध घेऊ पाहणारे र.वा. दिघे यांनी 'आई आहे शेतात', 'पड रे पाण्या !' (१९५८), 'पाणकळा', 'सराई' अशा लोकप्रिय कादंबऱ्या लिहिल्या आहेत. साठोत्तर कादंबरी वाङ्मयात गो.नी. दांडेकरांचा 'कादंबरीमय शिवकाल' उभा करण्याचा प्रयत्न महत्त्वाचा वाटतो. 'बया दार उघड', 'हर हर महादेव', 'दर्या भवानी' या कादंबऱ्यांमधून त्यांनी तो जिवंत केला आहे. ज्या सामाजिक परिस्थितीने शिवाजी राजाला जन्म दिला तिच येथे केंद्रस्थानी आहे. ऐतिहासिक कादंबरीच्या नावाखाली त्याच त्या घटनांच्या पुनर्लेखनाऐवजी असे प्रयत्न झाले तर ऐतिहासिक कादंबरीचे दिवस पालटू शकतील. भक्तिप्रधान मन:पिंडामुळे संतांच्या जीवनावरील चरित्रात्मक कादंबऱ्याही त्यांनी लिहिल्या. कादंबरी कोणत्याही स्वरुपाची असो दांडेकरांच्यातला संस्कारी लेखक सर्वत्र वावरत राहतो. त्यामुळे त्यांच्या कादंबरीविश्वावर एक भावुकता व्यापून राहिली आहे. संस्कृतिमूल्यांचा ऱ्हास, विघटित होत चाललेली कुटुंबसंस्था, मोडकळीस आलेला पारंपरिक गावगाडा या गोष्टींनी दांडेकर अस्वस्थ होतात; आणि त्या अस्वस्थतेतूनच त्यांच्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत.

याउलट दि.बा. मोकाशी यांच्या 'देव चालले' या कादंबरीच्या आशयसुत्रातून कालप्रवाहात होत चाललेला लोप, कुटुंबसंस्थेचे विघटन, दुरावलेले भावसंबंध अतिशय तटस्थपणे हाताळले आहे असे दिसून येते.

साठोत्तर काळात व्यंकटेश माडगूळकरांनी कथालेखनाबरोबरच 'वावटळ', 'कोवळे दिवस', 'करुणाष्टक', आणि 'सत्तांतर' या कादंबऱ्या लिहिल्या. गांधी हत्येनंतर निर्माण झालेल्या जातीय संघर्षाचे सामाजिक वास्तव त्यांच्या 'वावटळ' कादंबरीत आले आहे. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळातील भूमिगतांच्या चळवळीचे अल्पसे चित्रही त्यांच्या 'कोवळे दिवस' कादंबरीत रेखाटले आहे. परंतु 'बनगरवाडी' ची उंची त्यांच्या इतर कादंबऱ्यांना गाठता आली नाही. 'सत्तांतर' या कादंबरीचा विचार स्वतंत्रपणे करावा लागतो. या कादंबरीतील कथा ही वानराच्या सत्तांतराची 'कथा' आहे. पण ही कथा रुपकतेतून मानवी जीवनातील आदिम प्रवृत्तीचा शोध घेताना दिसते आहे.

उद्धव शेळके यांच्या 'धग' ने सामाजिक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला. या कादंबरीतली माणसं वैदर्भीय ग्रामीण-प्रादेशिक जीवनाचं प्रतिनिधित्व करतात. काळ्या वर्णाची कौतिक, आळशी महादेव अशा व्यक्ती आणि त्यांच्या भोवतीचं रुक्ष वातावरण याद्वारे दाहक सामाजिक आशय सामावून घेणारी साहित्यकृती लेखकाने घडविली. जन्मभर पोटाच्या आगीत होरपळणाऱ्या, शिक्षणादी सांस्कृतिक जीवनाला वंचित झालेल्या सर्वहारा बहुजन समाजाची ही कथा आहे. महारोग झाल्यामुळे घरी न परतलेला महादेव, परागंदा भीमा, दुर्दैवी आघातानी वेडी झालेली कौतिक आणि परिस्थितीपुढे हतबल होऊन शिक्षणापासून वंचित झालेला नामा यांची ही कथा अस्वस्थ करुन सोडते. वैदर्भी बोलीचे विशेष पचविलेली पारदर्शक भाषा आणि जीवनाचं अकृत्रिम आकलन यामुळे 'धग' हा वैदर्भीय ग्रामीण जीवनाचा महान आविष्कार ठरतो. शंकर पाटलांची 'टारफुला' रोमँटिक विशेषांचे दर्शन घडवते तर 'पाचोळा', 'गोतावळा' या कादंबऱ्यांनी कृषिसंस्कृती वरील यंत्रसंस्कृतीचे आक्रमण व पडसादाचे वर्णन केले.

१९७० नंतरच्या ग्रामीण कादंबरीने अनुभवाची अनेक क्षेत्रे धुंडाळली. स्वातंत्र्योत्तर काळात रझाकारी जुलुमाखाली होरपळून निघालेला मराठवाडा - खानदेशचा सीमाभाग 'गांधारी' मध्ये ना.धों. महानोरांनी रेखाटला. बुद्धिवाद आणि धर्मश्रद्धा या द्वंद्वात सापडलेली मने यांचे लक्ष्मीकांत तांबोळीनी 'दूर गेलेले घर' मध्ये चित्रण केले. ड्रायव्हर - क्लिनर, जोगते-जोगतिणी, विडीकामगार- शेतमजूर, भटक्या जमातीचे जीवन महादेव मोरेंनी 'स्टँड', 'वस्ती', यांसारख्या कादंबऱ्यांतून रेखाटले. बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे', 'वारुळ', व अशोक व्हटकर यांची 'बगाड' इत्यादिचाही नामोल्लेख करावा लागेल.

भाऊ पाध्ये यांच्या कादंबरीतून समकालीन समाजवास्तवाचं जबर भान प्रकट झालं. त्यांच्या कादंबरीतून महानगरीय समाजाचे विविध स्तर रेखाटले गेले. या संदर्भात 'डोंबाऱ्याचा खेळ' मध्ये कामगार जीवन, 'वासूनाका' मध्ये अर्धशिक्षित बेकारांचे वंचित अध:स्तरीय विश्व, 'जेलबर्ड्स' मध्ये काळाबाजार-खूनखराबा करणाऱ्या गुन्हेगारांचे अंडरवर्ल्ड, 'वैतागवाडी' मध्ये चाळसंस्कृती आणि अभावग्रस्त अगतिक मध्यमवर्ग  इत्यादी अनेक स्तर त्यांच्या कादंबऱ्यातून येतात. 'वासूनाका' मधील तरुणांच्या जगण्याचं त्यांच्या त्याच रासवट भाषेत निवेदन केलं आहे. मनोहर शहाणे 'धाकटे आकाश', 'झाकोळ', 'देवाचा शब्द' 'पुत्र' इत्यादी, प्रभाकर पेंढारकरांनी 'अरे संसार संसार', मधून मध्यमवर्गीय जीवनातले कारुण्य उत्कटपणे रेखाटले आहे. मनोहर तल्हार यांनी 'माणूस'मध्ये दोन कष्टकरी मित्रांच्या कथेच्या माध्यमातून जात-धर्म यांच्या पलीकडचे वर्गीय जाणिवांचे परिमाण घेऊन येणारे विश्व उभे केले आहे.

भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' हा नवकादंबरीचा पहिला दमदार आविष्कार होय. कादंबरीच्या रुढ संकल्पनेला 'कोसला' ने जबर धक्का दिला. ही एका अर्थाने साठपूर्वीच्या कादंबरीविरुद्धची जोरदार प्रतिक्रियाच होती. 'कोसला'चा रुपबंध, भाषा, निवेदनपद्धती इत्यादी अनेक बाबी लक्षात घेता हे सहज जाणवते. सुरुवातीला पांडुरंग नवखा वाटला तरी हळूहळू तरुण पिढीशी त्याची मैत्री झाली. पांडुरंग सांगवीकर ही वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा या कादंबरीत साकार झालेली होती. पांडुरंगचा मिश्किलपणा, त्याची विचार करण्याची अभिनव पद्धती आणि निवेदनपद्धती या गोष्टींनी ही कादंबरी आगळीवेगळी ठरली. भोवतालच्या समाजवास्तवात आपलं जगणं अर्थपूर्ण करु पाहणाऱ्या पांडुरंगाचा हा आत्मविष्कार होता. या अस्तित्वशोधात समोर येणाऱ्या अनेक गोष्टी तो नव्याने तपासत जातो. नातेसंबंध, रीतीरिवाज, शिक्षणपद्धती, प्रेम इत्यादी अनेक बाबींचा फोलपणा लक्षात येत जातो तसतसा तो निरर्थकतेने घेरला जातो. परात्मता अनुभवतो. परंतु त्याचा हा वैताग वांझोटा आहे. गिरधरचा विहंगममार्ग त्याला पेलत नाही, म्हणून तो शेवटी खुंट्यावर जाऊन उभा राहतो. इथेच त्याची आणि 'शंभरातल्या नव्याण्णवांची' तार जुळली. परंपरेच्या संदर्भात पांडुरंग प्रतिनायक ठरला. पांडुरंगचा वैताग अर्थपूर्ण ठरतो तो त्याच्या भोवतालच्या सामाजिक पर्यावरणाच्या संदर्भात. व्यक्ती आणि त्याच्या भोवतालचे वास्तव यांच्यातील व्यस्ततापूर्ण संबंध चितारण्यास लेखकास येथे असाधारण यश लाभले आहे. पांडुरंगच्या भाषेला व्यवहारभाषेची सहजसुंदर लय आहे. साहित्याची भाषा आणि व्यवहाराची भाषा यातील कृत्रिम अंतरच या कादंबरीने पुसून टाकले. 'कोसला'तून व्यक्त झालेली नवनैतिकवादी दृष्टी हा साठोत्तरी कादंबरीचा महत्त्वाचा विशेष ठरला.

व्यक्तीचे अनुभवविश्व आणि व्यक्तिगत मूल्यविचार येथे महत्त्वाचा ठरतो.

मराठी कादंबरीत भालचंद्र नेमाडेंनी नवे स्वीकारणारा मूल्यनिष्ठ नायक निर्माण केला. 'कोसला' मधील पांडुरंगच्या तुलनेत 'बिढार'मधला चांगदेव पाटील हे एक लक्षणीय स्थित्यंतर आहे. चांगदेव पांडुरंगप्रमाणे वैताग व्यक्त करुन न थांबता, अटळ जगण्याचा स्वीकार करतो. पाय रोवून वास्तवात उभा राहतो. भोवतालच्या मूल्यहीन वातावरणात आपले जगणे अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. 'जीवनाशी संबंध तोडू नको. ते घट्ट बिलगलेलं असतं' असं मनाला बजावत राहूनही हवं ते श्रेयस् न सापडल्याने पुन्हा नवं गाव, नवे रस्ते धुंडाळावे लागतात. नव्या गावी आल्यावर तो म्हणतो, ''आता इथं नखं रोवून रहायचं, हादरे बसू द्यायचे नाहीत. कुठल्या आतल्याबाहेरच्या चक्रात सापडून घ्यायचं नाही. अत्यंत बैलासारखं रहायचं, त्याच्यात जास्त कसोटी आहे.'' शेवटी आहे त्या वास्तवात जगणं अपरिहार्य असतं हे त्याने ओळखले आहे. 'जरीला' च्या शेवटी भेटलेला त्याचा समविचारी मित्र प्रा. नामदेव भोळे म्हणतो, ''आहे तसं जग स्वीकारायचं तर हा चिखूल खायचीही तयारी ठेवावी असं म्हणून मी इथं आलो. आता बघू याच्यातून काय निघतं ते.'' आमच्या शैक्षणिक, साहित्यिक आणि संस्कृतिक जीवनाच्या हलाखीचं अत्यंत भेदक चित्रण 'बिढार', 'जरीला' आणि 'झूल' या कादंबऱ्यांतून आलं आहे. नेमाडेची उपरोधपूर्ण शैली हे एक वेगळे वैशिष्ट्य होय. याच प्रवाहात अनंत कदम यांची 'पाखरु', भाऊ पाध्येची 'अनिरुद्ध धोपश्वरकर', किरण नगरकरांच्या 'सात सक्कं त्रेचाळीस', 'काळा सूर्य', 'हॅट घालणारी बाई' अशा काही कादंबऱ्यांचा समावेश होईल.

साठोत्तरी कादंबरी वाङ्मयात ठळकपणे लक्षात येणारी कादंबरी म्हणजे 'बळी', 'धग', 'माहीमची खाडी' इ. कादंबऱ्यामधून उपेक्षिताचे, समूहमनाचे दु:ख चित्रित करु झाले आहे. श्री.ना.पेंडसे, र.वा.दिघे, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, गो.नी. दांडेकर, रा.रं. बोराडे, उद्धव शेळके इ. लेखकांनी ग्रामीण, प्रादेशिक जीवनाचे अंत:स्तर दाखवण्याचा समृद्ध आविष्कार आपल्या लेखणीद्वारे केला आहे.

पुराणकथेला वर्तमानाचा अर्थ देण्याचा, पुराणातील व्यक्तिरेखाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न 'ययाती', 'मृत्युंजय', 'राधेय' सारख्या कादंबऱ्यातून होऊ लागला. 'ययाती'तील कथासूत्र पौराणिक असले तरी तिचा आशय - विषय आधुनिक आहे. जुने आदर्श, जुनी मूल्ये व संस्कृती याकडे पाठ फिरवून सुखवादी होऊ पाहणाऱ्या आधुनिक काळातील माणसाला संयमाचा संदेश देण्यासाठी खांडेकरांनी ही कादंबरी लिहिली आहे. स्वत: खांडेकरांनीच म्हटल्याप्रमाणे 'ती ययातीची कामकथा, शर्मिष्ठेची प्रेमकथा,

देवयानीची संसारकथा आणि कचाची भक्तिगाथा आहे.' कथेतील रंजनसामर्थ्य आणि सुभाषित प्रचुर भावूक निवेदनपद्धती यामुळे कादंबरी वाचनीय झाली आहे. याच प्रकारची आणखी एक कादंबरी म्हणजे शिवाजी सावंतांची 'मृत्युंजय' होय. वाचकांना पाहिजे तसा आणि पाहिजे तेवढाच कर्ण उदात्तीकृत स्वरुपात या कादंबरीत सादर करण्यात आला आहे. प्रत्येकाच्या मनात एक कर्ण दडलेला असतोच. त्याचीच कहाणी रणजीत देसाई यांच्या 'राधेय' मध्ये आली आहे. तसेच गो.नी.दांडेकरांच्या 'कर्णायन' ही कादंबरीही कर्णाची अशीच आणखी एक भावूक कथा आहे.

गतकाळाला सामोरे जाण्याच्या प्रेरणेतून वरखेडकरांची '१८५७ चा सेनानी', रणजित देसाई यांच्या 'स्वामी', 'श्रीमान योगी', ना.सं. इनामदाराच्या 'झेप', 'झुंज', 'मंत्रावेगळा', 'राऊ', 'शहेनशहा', इत्यादी कादंबऱ्यांची निर्मिती झाली. इतिहासातील घटितातील 'चैतन्य' गोचर करण्याचा, ऐतिहासिक व्यक्तिमधील माणूस शोधण्याचा प्रयत्न या कादंबऱ्यामागे होता. याच काळात चरित्रात्मक कादंबऱ्यांची लाट उसळली. श्री.ज.जोशीं यांची 'आनंदीगोपाळ' ही कादंबरी गोपाळराव जोशी व आनंदीबाई जोशी यांच्या जीवनकथेवर आधारित आहे. मृणालिनी देसाई यांची 'पुत्र मानवाचा' ही महात्मा गांधी, गंगाधर गाडगीळांची 'दुर्दम्य' ही लोकमान्य टिळक, हरिभाऊ पगारेंची 'युगप्रवर्तक' ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्योत्स्ना देवधर यांची 'उत्तरयोगी' ही योगी अरविंद, पद्माकर गोवईकर यांची 'मुंगी उडाली आकाशी' व गो.नी. दांडेकरांची 'मोगरा फुलला' या संत ज्ञानेश्वर, गो.नी. दांडेकरांची 'तुका आकाशाएवढा ही संत तुकाराम, सुमती क्षेत्रमांडे यांची 'जीवनस्वप्न' ही शरच्चंद्र चटर्जी, उद्धव शेळके यांची ' साहेब' ही आचार्य अत्रे तसेचउद्धव शेळके यांचीच 'मन:पूत' ही पु.भा. भावे, इत्यादी अनेक व्यक्तीच्या जीवनावरील चरित्रात्मक कादंबऱ्यांचा निर्देश करता येईल. याच काळात स्त्री-पुरूष संबंधाचे, समसंभोग, वासना, विकार, विकृतीचे धीटपणे चित्रण करण्याचा चि.त्र्यं. खानोलकर आणि भाऊपाध्येंचा प्रयत्न नवा होता. चि.त्र्यं. खानोलकरांनी 'रात्र काळी घागर काळी', 'अजगर', 'कोंडुरा', 'त्रिशंकू', 'गणूराया आणि चानी', 'अगोचर', 'पाषाण पालवी', 'भागधेय' या कादंबऱ्या लिहिल्या. तर भाऊपाध्ये यांनी 'वैतागवाडी', 'होमसिक ब्रिगेड' यांसारख्या कादंबऱ्या लिहिल्या.

जीवनाला 'ऑथेन्टिक' रूप नाही ते अर्थशून्य आहे. त्याला व्यवस्था नाही, ते भंकस आहे. या जाणिवेतून जन्माला आलेली भालचंद्र नेमाडेंची कादंबरी होय. जीवनाच्या अस्तित्वाची अंतिम एकतानता दर्शवणाऱ्या पु.शि. रेगे यांच्या 'सावित्री' (१९६२) अवलोकिता' (१९६४) रेणू' (१९६३) यासारख्या

कादंबऱ्या अभिजातवादी जीवनदृष्टीचे दर्शन घडवताना दिसतात. व्यक्ती आणि समष्टी यांच्या परस्पर संबंधाचा वेध घेणाऱ्या शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या 'क्षिप्रा', 'सरहद्द', 'जन हे वोळुतू जेथे' या कादंबऱ्या जीवनाच्या स्वतंत्रतेचे महात्म्य सांगतात. अशा प्रकारे कादंबरी वाङ्मयात साठनंतर ग्रामीण, प्रादेशिक, वास्तववादी, व्यस्ततावादी, ऐतिहासिक, पौराणिक, चारित्रात्मक, व्यक्तिनिष्ठ आकलन देणाऱ्या, समूहनिष्ठ आकलन देणाऱ्या, जीवनातील अर्थशून्यता व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्यांचा प्रवाह निर्माण झालेला दिसतो.

१९६० नंतर 'दलित साहित्या'ला सुरूवात झालेली आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र-आत्मचरित्र अशा अंगाने त्या साहित्याची निर्मिती जोर धरताना दिसते. वेदना, विद्रोह, नकार घेऊन येणारे हे वाङ्मय आक्रमक व सडेतोडपणे रूढी, परंपरा, मानवतेला काळिमा फासणाऱ्या वृत्तीप्रवृत्तींवर तुटून पडते व व्यापक मानवता निर्माण होण्याचा अट्टाहास धरते. जगलेलं, भोगलेलं जीवन ते आपल्याच बोलीभाषेत सांगू पाहते व वेदनेला शब्दरूप देऊन ते व्यापक स्वरूपात वाचकासमोर मांडते. अण्णाभाऊ साठे यांनी 'वैजयंता', 'माकडीचा माळ', 'आवडी', 'वैर', 'रानगंगा', 'पाझर', 'मास्तर', 'वारणेचा वाघ', 'चंदन', 'अलगूज', 'केवड्याचं कणीस', 'चिखलातील कमळ' अशा १९५१ ते १९७४ पर्यंतचे त्यांचे कादंबरीलेखन समृद्ध आहे. शंकरराव खरात यांच्या 'हातभट्टी', 'मी मुक्त-मी मुक्त', 'गावचे टिनोपाल गुरूजी', 'माणुसकीची हाक', बाबुराव बागूल यांची 'सूड' व 'अघोरी', केशव मेश्राम यांची 'हकीकत आणि जटायू', ना.रा. शेंडे यांची 'काजळीरात्र', 'विलासिनी', 'अन्शुजा' 'तांबडा दगड' इत्यादींच्या साहित्यात वरील वैशिष्ट्ये दिसतात. आंबेडकरी प्रेरणा मानणारे व समष्टीचं दु:ख व्यक्त करणारे हे साहित्य आहे.

ग्रामीण, प्रादेशिक या प्रवाहाच्या हातात हात घालून चालणारा समांतर प्रवाह म्हणजे स्त्रीवादी प्रवाह होय. स्त्री सुशिक्षित झाल्यानंतर तिला स्वत्वाची, अस्तित्वाची जाणीव झाली. तिच्यावर लादलेले परंपरेचे व कर्मठ संस्कृतीतील बंधने तिचे 'माणूसपण' हिरावून घेते आहे. याची जाणीव तिला झाली. अस्पृश्यांपेक्षाही आपल्याला नीच दर्जाची वागणूक दिली जाते. या विषयीची जागृती तिला झाली. याच जाणिवेतून ती स्वत:च्या अनुभवाला शब्दरूप देवू लागली व अन्याय, अत्याचार, बंधने याविरुद्ध पुरूषी वर्चस्वाविरुद्ध तिने बंडखोरी धारण केली. याच जाणिवेतून जे लेखन झाले ते म्हणजेच 'स्त्रीवादी साहित्य' होय. विभावरी शिरूरकर यांची 'बळी', ज्योत्स्ना देवधरांची 'घर गंगेच्या काठी', 'कल्याणी', 'कुंवरनी', सुमती क्षेत्रमाडे

यांची ‘आधार’ व ‘महाश्वेता’, गौरी देशपांडे यांची ‘कारावासातून पत्रे’, ‘एकेक पान गळावया’, ‘निरगाठी’, ‘थांग’, ‘तेरूओ’, ‘काही दूरपर्यंत’, कमल देसाईंची ‘काळासूर्य आणि हॅट घालणारी बाई’, ‘रात्रंदिन आम्हा’, सुलोचना देशमुखांची ‘आदिमाया’, ‘काचापाणी’, ‘कामायनी’ इत्यादींनी स्त्रीवादी दृष्टिकोणातून लेखन केले आहे. १९६० च्या दशकाचा सर्वांगांनी विचार केल्यास कादंबरी वाङ्मयात वेगवेगळ्या प्रवृत्ती, प्रवाह, विभागणी झालेली असली तरीही मानवतेच्या मूल्याचे दृढीकरण करताना लेखकांची प्रयोगशीलवृत्ती दिसून येते.

१९७० नंतरचे कथा, कादंबरी आणि एकूण सर्वच लेखन हे आत्मविश्वासाने वाटचाल करू लागले. वास्तवतेला हात घालणे व विषयात विविधता आणणे ही वैशिष्ट्ये या कालखंडातही दिसतात. त्यामुळेच मराठी साहित्यातील अनुभवाच्या कक्षा रुंदावलेल्या दिसतात. ग्रामीण-प्रादेशिक अशी गटवारी आता लोप पावत चाललेली दिसते. १९७० नंतरचे बदलते संदर्भ साहित्यात नमूद केले जात आहेत. तत्कालीन समस्यांना साहित्यात स्थान मिळत आहे. वैश्विकरण, मुक्त अर्थव्यवस्था, वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षेत्रामध्ये झपाट्याने चाललेली घोडदौड, प्रदूषण समस्या, जाहिरातबाजी, चंगळवाद अशा अनेक समस्यांना काही प्रमाणात शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न या दशकातील लेखक दिसतात. या कालखंडातील साहित्यिकांत वसंत आबाजी डहाके यांचे ‘अधोलोक, प्रतिबद्ध आणि मर्त्य’; अनिल बर्वे यांची ‘थॅक्यू मिस्टर ग्लाड’ ही एका वेगळ्याच विषयावरील कादंबरी आहे. ध्येयवेडा राजकीय कैदी वीरभूषण आणि करड्या स्वभावाचा जेलर यांच्यातील अनोख्या भावसंबंधाचे चित्रण तिच्यात आहे. ‘स्टड फॉर्म’ कादंबरीमध्ये अनिल बर्वे यांनी रेसच्या जुगारात गुरफटलेल्या लोकांचे विश्व चित्रित केले आहे. त्यांच्या ‘डोंगर म्हातारा झाला’, ‘अकरा कोटी गॅलन पाणी’ या कादंबऱ्या. विलास सारंग याची ‘एंन्कीच्या राज्यात, बा.ग. केसकर यांची ‘कुणाच्या खांद्यावर’, राजन गवस यांचे ‘चौडकं, ‘भंडारभोग’, उत्तम बंडू तुपे यांची ‘झुलवा’, ‘काट्यावरची पोटं’, ‘खाई’ या कादंबऱ्या. अरूण साधू यांच्या ‘मुंबई दिनांक’ या कादंबरीमध्ये राजकारण, पत्रकारिता, कामगार चळवळ आणि मध्यमवर्गीय जीवनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न होतो. तटस्थ रिपोर्टाज पद्धतीची निवेदनपद्धती हाही तिचा विशेष ठरतो. सत्तास्पर्धेच्या राजकारणाचे चित्र ‘सिंहासन’, ‘तडजोड’ मध्ये येते. ‘शापीत’, ‘विप्लवा’ या त्यांच्या इतर कादंबऱ्या. विश्वास पाटील यांची ‘पांगिरा’, ‘झाडाझडती’ ही ग्रामीण प्रवाहातील लक्षणीय कादंबरी. धरणग्रस्तांच्या जीवनाचे आशयद्रव्य अत्यंत ताकदीने या कादंबरीत लेखकाने ओतले आहे. धरणामुळे केवळ गावेच उद्ध्वस्त झाली नाहीत तर

माणसेही उद्ध्वस्त झाली, काही परागंदा झाली. काही पुनर्वसनाच्या वळचणीला येऊन कायम उपरी म्हणून जगू लागली तर काही पुनर्वसनाच्या आशेने जीव तगवीत तसेच जगत राहिली. धरणग्रस्त शेतकरी, आदिवासी यांच्या हालअपेष्टा, पुढारी आणि सरकारी अधिकाऱ्याची दुटप्पी कागदी धोरणे, अंतर्गत हेवेदावे, संधिसाधूंची राजकारणे इत्यादी अनेक बाबींची लेखकाने केलेली वर्णने आणि गुंफलेले ताणेबाणे उल्लेखनीय आहेत.

ग्रामीण प्रवाहात रा.रं. बोराडे यांची 'सावट', आनंद यादव यांची 'नटरंग', 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती', सानिया यांची 'स्थलांतर', नामदेव कांबळे यांची 'राघववेळ', अशोक व्हटकर यांची 'मेलेलं पाणी', आनंद पाटील यांची 'कागूद आणि सावल्या', अनंत मनोहर यांची 'राब', पुरूषोत्तम बोरकर यांची 'मेड इन इंडिया', लक्ष्मण लोढे यांची 'देवासि जिवे मारिले', बाबा भांड यांची 'दशक्रिया', वासुदेव मुलाटे यांची 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीत शहरी संस्कृतीचे आक्रमण आणि संक्रमण यामुळे बदलत, किडत चाललेल्या ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले आहे.

सदानंद देशमुख यांनी 'तहान', 'बारोमास' या कादंबऱ्यांतून बदलत्या ग्रामीण जीवनात माणसाच्या मनाच्या दुभंगलेपणाचा, होरपळलेपणाचा वेध घेतला आहे. मधू मंगेश कर्णिक यांनी 'माहिमची खाडी', ह.मो. मराठे यांनी 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी', 'सॉप्टवेअर', 'देवाची घंटा', 'इतिवृत्त', 'कुरुक्षेत्र, इ. कादंबऱ्या लिहिल्या आहेत. डॉ. भाल पाटील यांची 'तीन तरूण, दोन तरूणी आणि एक बंड' ही कादंबरी परदेशातील काळ्या गोऱ्यांच्या संघर्षाचे चित्रण करते. आजच्या  विज्ञान युगातील नवे अनुभवविश्व जयंत नारळीकरांनी 'वामन परतुनी न आला', 'व्हायरस' या कादंबऱ्यातून रेखाटले आहे. लक्ष्मण लोंढे यांची 'देवासी जीवे मारिले', प्रभाकर पेंढारकरांची 'अरे संसार संसार,'रारंगढांग' अशी उल्लेखनिय नावे या काळात कादंबरी प्रवाहात नोंदवावी लागतात.

साठोत्तरी मराठी कादंबरी अनेक दिशांनी शाखोपशाखांनी विकसित-विस्तारित झालेली दिसत असली तरी आणि वास्तवसन्मुखता हेच तिचे मुख्य वैशिष्ट्य राहिले असले तरी कादंबरी या वाङ्मयप्रकाराची जाण आणि मूल्याधिष्ठित समग्रलक्षी जीवनदृष्टी किती ठिकाणी दिसून येते, हा प्रश्न उपस्थित होतो. अनेकदा वास्तववादाची सूज, न पचलेल्या अस्तित्ववादी-अतिवास्तववादी जाणिवा आणि छुपा रंजनवाद अशी सरमिसळ दिसून येते. विशेषतः १९७५ नंतर कादंबरी रचनेचा रूढ फॉर्म बदलला आहे. जीवनाला भिडण्याची कादंबरीची ताकद वाढली आहे. परंतु ती अजूनही रंजनवादी तंत्रे आणि

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

मध्यमवर्गीय अभिरूचीच्या दबावाखाली आहे हे नाकारता येणार नाही.

श्याम मनोहर आणि रंगनाथ पठारे यांनी मात्र आपले वेगळेपण अत्यंत अर्थपूर्ण स्वरूपात व्यक्त केलं आहे. साठच्या दशकातील नेमाडे, भाऊ पाध्ये प्रणित कादंबरीचा 'अर्थपूर्ण विस्तार' म्हणून या कादंबरीकाराचा उल्लेख करावा लागतो. या कादंबरीकारानी अनेक 'केंद्रीरूप' आणि विस्तृत जीवनानुभवाला सामावून घेण्याचे प्रतिभा सामर्थ्य सिद्ध केले आहे.

**संदर्भ :**

१) राजवाडे वि.का. : 'कादंबरी', *लेखसंग्रह* (संपा) लक्ष्मणशास्त्री जोशी, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, द्वि.आ., १९८९, पृ. २७७

२) तत्रैव, पृ.२८३

३) Scholes, Robert/kellog, The Narrative tradition, Davis, Robert Murry, ed. The Novel: Modern Essays in Critisim,New jersy, prentice hall, 1969, pp.24-25

४) Frye, Northrop, Specific continuous forms (prosefiction) Davis Robert M.

५) हस्तक उषा : 'साहित्य - अध्यापन आणि प्रकार', मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८७, पृ.२६१

६) तत्रैव, पृ. २५५

७) Karmode, Frants, Novel and Narrative, Halprin, John ed. The Theory of Novel : New Essays, Newyork, Oxford university press, 1974, p.155

८) नेमाडे भालचंद्र : 'टीकास्वयंवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९९० पृ.१९८

९) बापट प्र.वा /गोडबोले ना.वा. : 'मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास)', व्हीनस प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९७३, पृ.२२५

१०) तत्रैव, पृ. २२६

११) बांदिवडेकर चंद्रकांत : 'मराठी कादंबरीचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. १९८९, पृ.४